मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned with CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ७ अंक : २

पौष, माघ, फाल्गुन शके १९४२
जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २०२१

---

संपादक : श्री. भीमसेनराव माड्यालकर
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

---

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने 'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

( संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with CamScanner

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- 'जीवनसेतु'मधील हैदराबाद पोलीस ॲक्शन : एक आकलन / प्रा. समाधान काशिराम सातव ७
- महानुभाव पंथाच्या सांकेतिक लिप्यांचा अभ्यास - एक मौलिक संशोधन / प्राचार्य डॉ. पंडितराव पवार १७
- कला साहित्याचे तत्त्वज्ञान : सौंदर्यशास्त्र / प्रो. डॉ. श. लोखंडे २९
- सादत हसन मंटो यांच्या वादग्रस्त कथा / सर्वोत्तम सताळकर ३२
- मायेचा पाझर... आजीचा पान्हा (कथा) / माला पारीसे ४१
- वेदार्थाचे तुषार : आई (१) / डॉ. सूर्यकांत डी. चव्हाण ४९
- जन्मदात्रीचे स्मरण.... / प्रा. व्यंकटेश वळसंगकर ५९
- भाऊकाका - एक आदरणीय व्यक्तिमत्त्व/ मालती देऊळगावकर ६३
- कविता.... कविता.... कविता.... कविता.... ६७
- 'लय भारी' - पंजाब वारी / प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ७३
- गुलबर्ग्यातला गणेशोत्सव ! / मुरलीधर अभ्यकर ७६
- महाशिवरात्र / मीनाक्षी बक्षी ८०
- प्रा. वळसंगकरांचे 'आत्मप्रत्ययाचे भावपदर' / प्राचार्य डॉ. पंडितराव पवार ८६
- रम्य आणि वास्तव अनुभवांचे लेखन / प्रा. व्यंकटेश वळसंगकर ९०
- मंडळाची वाटचाल..... ९४


Scanned with CamScanner

# 'लय भारी' - पंजाब वारी

• प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

अधिव्याख्याता म्हणून महाविद्यालयात रुजू झाल्यावर चार टप्प्यांवर स्थाननिश्चिती करून घेणे अनिवार्य असते. त्यासाठी आपापल्या विषयातील उजळणी वर्ग (Refresher Course) करणे बंधनकारक असते. अशाच एका मराठी विषयाच्या उजळणी वर्गासाठी पंजाबी विद्यापीठ, पतियाळाने आयोजित केलेल्या कोर्ससाठी १७ नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०१४ मध्ये पंजाबला जाण्याचा योग आला. त्या विद्यापीठाने मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, पंजाबी, कानडी, आसामी अशा विविध भाषांच्या प्राध्यापकांसाठी कोर्सचे आयोजन केले होते. पतियाळा विद्यापीठाने कोर्ससाठी माझी निवड केली; पण माझ्यासमोर प्रश्न उभा ठाकला; तो म्हणजे सुमारे दीड हजार किलोमीटर दूर असणाऱ्या अनोळखी प्रदेशात जायचे कसे ? आतापर्यंत गोवा सोडले तर मी इतर कोणत्याही राज्यात गेलो नव्हतो. बरं गोवा म्हणजे महाराष्ट्राचाच भाग असल्यासारखे. तिथे मराठी, कोकणी बोलणारी मंडळी होती. त्यामुळे भाषेची कोणतीही अडचण नव्हती; पण पंजाबमध्ये मराठी भाषा चालणार नव्हती. काय करावे कळत नव्हते. असा प्रवासाचा प्रश्न भेडसावत असताना मला आठवण झाली ती संत नामदेवांची. त्यांनी १४व्या शतकात त्यावेळी दळणवळणाची कोणतीही साधने नसताना पायी पंजाबची वारी करून भागवत धर्माची पताका पंढरीपासून घुमानपर्यंत नेली होती. संत नामदेवांच्या कार्यातून मला प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतूनच स्वत:च्या मनाचा दुबळेपणा झटकून टाकण्याचा निश्चय केला. त्यात माझा भाचा रोहित हासुध्दा पंजाबमधील मोहाली येथे आयसर मध्ये एम. एस. करण्यासाठी गेला होता. त्यामुळे त्याच्या मदतीने रेल्वेचे तिकीट काढून पंजाबला जाण्यास सज्ज झालो.

१५ नोव्हेंबरला पुण्यातून झेलम एक्स्प्रेसने निघालो. राजस्थानमधील वाळूंचे डोंगर, सोनपत-पानपतची भूमी, दिल्लीमधील प्रवाशांची लगबग अनुभवत गाडी पंजाबला पोहोचली. या प्रवासात (दिल्ली) हस्तिनापुरच्या अर्जुनास मदत

करणाऱ्या कृष्णापासून, पानिपतच्या रणसंग्रामातील सदाशिवभाऊंच्या पराक्रमापर्यंत व कुरुक्षेत्रावरील धर्मयुद्धाचा प्रसंग मन:पटलावर चित्रित होत होता. दुसऱ्या दिवसी अंबाला स्टेशनवर उतरून पतियाळा ट्रेन पकडून नियोजित ठिकाणी पोहोचलो. पंजाबमधील सखल प्रदेश नजरेत मावत नव्हता. पाच नद्यांचा संगम असणारा 'पंजाब', सुजलाम् सुफलाम् 'पंजाब', शिखांची भूमी 'पंजाब', रणवीरांची भूमी 'पंजाब', जणू पंचमहाभूतांच्या साक्षीने आमचे स्वागत करीत आहे, असा भास मला होत होता. १७ नोव्हेंबरला कोर्स सुरू झाला. ४७ सहभागी प्राध्यापकांमध्ये आम्ही वेगवेगळ्या विषयांचे १८ प्राध्यापक महाराष्ट्रातील होतो. त्यामुळे परकं वाटण्याचं कारणच नव्हतं. शिवाय पंजाबी लोकांचे आदरातिथ्य वाखाणण्याजोगे असल्याने मन त्या वातावरणात रमलं. कोर्स सुरळीत सुरू झाला. वेगवेगळ्या वक्त्यांची व्याख्याने ऐकण्यात आठवडा गेला. रविवारची सुट्टी येण्याअगोदरच आम्ही महाराष्ट्रातील प्राध्यापक एकत्र आलो आणि पंजाब बघण्याचे नियोजन चालू झाले.

पहिल्या रविवारी सुवर्ण मंदिर, जालियनवाला बाग, वाघा बॉर्डर बघण्याचे ठरले. पहाटे उठून खाजगी गाडीतून प्रवासास निघालो. आजपर्यंत ऐकलेल्या, वाचलेल्या व अभ्यासलेल्या ठिकाणांना आज आम्ही प्रत्यक्ष बघणार होतो. शिख बांधवांचे पवित्र ठिकाण म्हणजे सुवर्णमंदिर. तेथे जाऊन माथा टेकला. शिखांच्या 'गुरू ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथामध्ये आपल्या संत नामदेवांचे ६३ अभंग आहेत. मंदिरात त्याचे वाचन व पठण नित्यनेमाने चालू असते. अहो, संत नामदेवांचे कार्य माहीत नाही, असा एकही पंजाबी माणूस भेटणार नाही. त्यानंतर जालियनवाला बाग बघण्यासाठी छोट्या बोळातून जाताना १९१९ साली नि:शस्त्र असणाऱ्या भारतीयांवर जनरल डायरने केलेला बेछूट गोळीबार आठवला. त्या उद्यानात पोहोचलो; ते सर्व पाहिलं आणि अक्षरश: आपोआप डोळ्यांतून पाणी आलं. अहो, देशभक्तीपर गीतात लतादीदींनी म्हंटलेच आहे, 'ये मेरे वतन के लोगों, जरा आँख में भरलो पानी, जो शहीद हुऐ है उनकी, जरा याद करो कुर्बानी' हा सारा इतिहास, देशप्रेम आमच्या पिढीच्या खोल अंत:करणात रुतून बसलेला आहे. अशा प्रसंगांवेळी तो उफाळून बाहेर येतो. त्यानंतर वाघा बॉर्डर आणि तेथील ती रोमांचकारी परेड ! अहो, प्रत्येकाने ही परेड प्रत्यक्ष बघायलाच हवी अशी आहे. आपली बीएसएफची फौज तिथे तैनात आहे म्हणूनच आपण सुखासमाधानाने झोपतो आहोत. परेड संपल्यावर पाकिस्तानच्या गेटपर्यंत जाऊन फोटो काढण्याची संधी मिळाली. अभिमानाने छाती फुगून गेली होती. खरं तर अशी ठिकाणे आपण



Scanned with CamScanner

तीर्थक्षेत्रे मानायला पाहिजेत, असे मला वाटते. दुसऱ्या रविवारी मोहाली, चंदिगड व सिमला पाहिला. मोहालीत शिकणाऱ्या भाच्याची गाठ घेतली; पण या आठवड्यातील फिरणे म्हणजे फक्त मजेसाठीच होतं. चंदिगडमधील रॉक व रोझ गार्डन, सिमल्यामधील गगनचुंबी हनुमानाची मूर्ती, कुफरीकडे जाताना घोड्यावरील रोमांचकारी प्रवास अगदी सगळं उत्साहवर्धक आणि मनाला आल्हाद देणारं होतं.

'भाव अनुबंध'च्या वाचकांना सांगायला मला आवडेल की, मी तिथे फक्त फिरून आलो नाही तर शिख बांधवांची पवित्र पगडी मी पूर्ण एक दिवस परिधान केली होती. मी सातवी-आठवीत असताना इतिहासात कुठंतरी संग्राम नाव यायचं तेव्हा माझे मित्र मला 'संग्रामसिंग' म्हणायचे. तेव्हापासून शिखांच्या पगडीचं मला आकर्षण होतं. आमच्या कोर्समध्ये असणाऱ्या एका शिख बांधवाला 'मी पगडी बांधू शकतो का ?' असे विचारले. त्याच्या अनुमतीने व सहकार्याने मी दुसऱ्या दिवशी सकाळी ९:३० पासून सायंकाळी ७:३० पर्यंत खरंच 'संग्रामसिंग' होतो. पगडी घालून ज्यावेळी क्लासरूममध्ये गेलो त्यावेळी सगळ्यांनी टाळ्या वाजवून स्वागत केलं. मग स्टेजवर जाऊन म्हणालो, 'मी प्रथमत: भारतीय आहे म्हणून पहिल्यांदा सर्वांना जयहिंद, महाराष्ट्रातून आलोय म्हणून रामराम आणि आज माझ्या डोक्यावर पगडी आहे म्हणून सत् श्री अकाल, तसेच आपल्या मुस्लीम बांधवांसाठी सलाम वालेकूम !' असा सुरुवातीचा सोपस्कार झाल्यावर शाहीर साबळे लिखित 'जय जय महाराष्ट्र माझा' हा पोवाडा खड्या आवाजात सादर केला. त्यातही दिल्लीच्या दिशेने हात करून 'दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा......' असे अभिमानपूर्वक सादरीकरण करून खाली आलो. त्यावेळी हृदयात राष्ट्रप्रेम, अंगावरती रोमांच तर सर्व सभागृह टाळ्यांच्या गजरांत विलीन झाले होते. आज हे सारं लिहिताना मी पुन:प्रत्ययाचा आनंद घेतोय आणि माझं मन म्हणतंय, खरंच-पंजाब वारी 'लय भारी !'

**– प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई.
ईमेल : sangramthorat750@gmail.com
मोबा. : ९६०४०४६०८४

★ ★ ★



Scanned with CamScanner